PlanetRead

Literacy for a Billion

Movie: Maai baap
Year:

Song: Fandiwarle ghar kosalate
Lyricist:

फांदीवरले घर कोसळते
फुटता पंख पिलांना
तुला पक्षिणी कुणी ना उरते
कुठला लळा जिव्हाळा
कुठला लळा जिव्हाळा
तुझ्यासाठी प्राणांचा मी दिवा लावीला
सुखाने तू रहा बाळा
आशिर्वाद तुला आईचा
तुझ्यासाठी प्राणांचा मी दिवा लावीला
सुखाने तू रहा बाळा
आशिर्वाद तुला आईचा
कुणी सांगे बाळा तू रे
त्रैलोक्याचा स्वामी
कुणी सांगे बाळा तू रे
त्रैलोक्याचा स्वामी
अन्नासाठी दारोदारी फिरे आंधळी मी
दौलतीच्या दिमाखाने
नको होऊ अंधराजा

तुझ्या एका आठवाने गळा दाटला
सुखाने तू रहा बाळा
आशिर्वाद तुला आईचा
धनापायी मनाचा ना
कधी तोल ढळावा
धनापायी मनाचा ना
कधी तोल ढळावा
कुणाच्याही कुसंगाचा
तुला मोह नसावा
श्रीमंतीच्या डोलाऱ्याचा
गरीबीला शाप ऐसा
आनंदाची फुले यावी
तुझ्या वेलीला
सुखाने तू रहा बाळा
आशिर्वाद तुला आईचा
तुझ्यासाठी प्राणांचा मी दिवा लावीला
सुखाने तू रहा बाळा
आशिर्वाद तुला आईचा

*Disclaimer: PlanetRead does not own these lyrics and is not using them for any commercial purpose. For over 20 years, PlanetRead has been subtitling Bollywood songs for mass literacy. These lyrics are being offered as part of PlanetRead's literacy development initiative.*

*PlanetRead is a tax-exempt, not-for-profit: 501(c) (3) in the United States and 80(G) in India.*